अनुक्रम ३९५३८ दि:
क्रमांक

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥

# सुश्लोक-श्रीगुरुचरित्र

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

कवि- श्री. विष्णुसुत, उंब्रजकर.

प्रथमावृत्ति फेब्रुवारी १९५९

मूल्य-नये १६ पैसे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा
अनुक्रम 39538 वि
क्रमांक
नों. दि.
10449

# " सुश्लोक-श्रीगुरुचरित्र "

(वृत्त-वसंततिलका)

अध्याय

प्रारंभि वंदन गणेश सरस्वतीला ।
१ तैसें विधी-हरि-हर त्रय देवतांला ॥
व्यासादि आद्यकवि पूर्वज वंद्य त्याला ।
वंदी तसेंच गुरु-तात-नि माउलीला ॥ १ ॥

२ ब्रह्मांड निर्मिति कशी घडली अपूर्व ।
ती आणि 'दीपक-कथा' कथि 'ब्रह्मदेव' ॥
सच्छिष्य तोच उतरे गुरुच्या कसाला ।
त्याच्यावरी करिति सद्‌गुरुही कृपेला ॥२॥

३ घे तीर्थ सोडि उपवासहि 'अंबरीष' ।
'दुर्वास' मात्र झणिं शापितसे तयास ॥
शिक्षा सुदर्शनच दे परि त्या मुनीला ।
भक्त-प्रभाव असला कळला जगाला ॥३॥

६ काढूनि आंत्र शिव गायनिं तुष्ट केला ।
घेऊन लिंग झणिं रावणही निघाला ॥
ते लिंग ठेवि गिरिजासुत ज्या स्थळाला ।
'गोकर्ण' पुण्यनगरी म्हणतात तीला ॥४॥

# सुश्लोक गुरुचरित्राचा परिचय

माझे कवि बन्धु श्री " विष्णुसुत " यांनीं श्रीगुरुचरित्रांतील कथा सुसंगत, पण लक्षांत राहण्याच्या दृष्टीनें श्लोकबद्ध, अशा थोड-क्यामध्यें या पुस्तिकेंत लिहिल्या आहेत. कोणत्या अध्यायीं कोणत्या कथा आल्या आहेत, याचेंही सूचक दिग्दर्शन पुस्तिकेंत श्लोकासमवेत केलें आहे. त्यामुळें गुरुचरित्राचा हा एक पद्यमय सूचिलेखच तयार झाल्यासारखा आहे. याच्यावरून गुरुचरित्रांशी परिचित असणारांना यांतील एकेक श्लोक वाचतांच त्या श्लोकांतील अध्याय स्मृति-जागृतीनें आनंद देतील आणि गुरुचरित्राशी अपरिचित असणारांना मूळ कथा व गुरुचरित्र पाहाण्या, वाचण्या, अभ्यासण्याची स्फूर्ति देतील. अशा भक्तिभावानें भरलेल्या या प्रासादिक सुश्लोक श्रीगुरु-चरित्रांतील या नव्या " अवतरणिकेचा " उपयोग तीन तऱ्हेनें होईल. एकतर सर्व गुरुचरित्र एकाच बैठकींत वाचावें अशी तीव्र इच्छा असणाऱ्या, पण परिस्थितीमुळें तितकी फुरसत नसणाऱ्या भाविकांची ही सुटसुटित सोय झाली आहे. दुसरें, जिज्ञासा असणाऱ्या भगिनींना गुरुचरित्रसार लक्षांत येण्याची सोय येथे झाली आहे, आणि तिसरें म्हणजे अभ्यासकांना गुरुचरित्राचा संक्षेपक म्हणून ही पुस्तिका उपयोगी पडणार आहे नृसिंहसरस्वतींच्या ५०१ व्या पुण्यदिनानिमित्त कविवर्य 'विष्णुसुत' यांनीं केलेली ही सेवा उचित आणि अभिनंद-नीय आहे.

मिति माघ शु॥ ५
शके १८८०

पुरुषोत्तम पांडुरंग ऊर्फ
बाबूराव गोखले, कऱ्हाड

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 39530 वि
क्रमांक
नों. दि.
10449
दा. क्र.

# " सुश्लोक-श्रीगुरुचरित्र "

(वृत्त-वसंततिलका)

अध्याय प्रारंभि वंदन गणेश सरस्वतीला ।
१ तैसें विधी-हरि-हर त्रय देवतांला ॥
व्यासादि आद्यकवि पूर्वज वंद्य त्याला ।
वंदी तसेंच गुरु-तात-नि माउलीला ॥ १ ॥
२ ब्रह्मांड निर्मिति कशी घडली अपूर्व ।
ती आणि 'दीपक-कथा' कथि 'ब्रह्मदेव' ॥
सच्छिष्य तोच उतरे गुरुच्या कसाला ।
त्याच्यावरी करिति सद्‌गुरुही कृपेला ॥२॥
३ घे तीर्थ सोडि उपवासहि 'अंबरीष' ।
'दुर्वास' मात्र झणि शापितसे तयास ॥
शिक्षा सुदर्शनच दे परि त्या मुनीला ।
भक्त-प्रभाव असला कळला जगाला ॥३॥
६ काढूनि आंत्र शिव गायनिं तुष्ट केला ।
घेऊन लिंग झणि रावणही निघाला ॥
ते लिंग ठेवि गिरिजासुत ज्या स्थळाला ।
'गोकर्ण' पुण्यनगरी म्हणतात तीला ॥४॥

अध्याय वैधव्यकालिं सति 'सौमिनि' भ्रष्ट झाली ।
७ देहार्पणा करुनि अंत्यजि ती उदेली ॥
ती व्याधिजर्जर शिवावरि बिल्व फेकी ।
'गोकर्णपुण्य' तिज पाठवि सांबलोकीं ॥५॥

७ 'इक्ष्वाकु–भूपतिस' शाप 'वसिष्ट' देई ।
तैशात विप्रवध त्याकडुनीहि होई ॥
गोर्कणि जाय तयिं उद्धरिलें नृपाला ।
गोकर्ण-पुण्य-महती कळली जगाला ॥ ६ ॥

४ 'श्रीब्रह्मदेव-शिव-विष्णु' मिळोनि येती ।
भूमीवरी 'अनसुया-गृहिं' सत्व घेती ॥
बाळें क्षणांत करि ती स्वबलें तिघांला ।
'दत्तावतार पहिला' म्हणती तयाला ॥७॥

५ भिक्षामिषें 'सुमति-मंदिरिं' दत्त येती ।
भिक्षान्न वाढुनि तयांप्रति तोष दे ती ॥
दत्तावतार सतिच्या उदरास आला ।
'श्रीपादवल्लभ' गुरू म्हणती तयांला ॥८॥

८ तो 'अंबिका-तनय' मंदमती निघाला ।
'श्रीपाद' त्यावरि मुदें करिती कृपेला ॥

अध्याय त्या ज्ञान-वित्त-सुत देवुनि तोषवीला ।
‘ श्रीपाद-वल्लभ-पदां करुं वंदनाला ’ ॥९॥

९ राहे कुणी रजक त्या ‘ कुरवी पुराला ’।
तो वांछि राज्य-पद-लाभ मिळो स्वतांला ॥
दे जन्म म्लेंछ-नृपती-कुलिं ‘ बेदराला ’ ।
‘ श्रीपाद-वल्लभ-पदां करुं वंदनाला ’ ॥१०॥

१० तो ‘ वल्लभेश ’ धन अर्पु निघे गुरूला ।
मार्गामधें वधिति तस्कर-लोक त्याला ॥
चोरास ठार करुनी उठवी द्विजाला ।
‘श्रीपाद-वल्लभ-पदां करुं वंदनाला ’ ॥११॥

११ ते १३ ज्या लाभला जनक ‘ माधव ’ विप्रवंशीं ।
‘अंबाभवानि ’ तशि मायहि पुण्यराशी ॥
ज्यांचा ‘करंजनगरीं ’ अवतार झाला ।
‘त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ’ ॥१२॥

१३ प्रख्यात ‘ माधव-अरण्य ’ नृसिंह भक्त ।
त्यातें नृसिंहसम सद्गुरु भासतात ॥
दे ब्रह्मलोक मनिं तोषुनि त्या यतीला ।
‘ त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ’ ॥१३॥

अध्याय मानी गुरूहि मनि ‘ सायनदेव ’ त्यासी ।
१४ मिष्टान्न घालुनि करी सुखि कुष्टियासी ॥
तद्वंश उद्धरुनि त्यासि कृतार्थ केला ।
‘ त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ’ ॥१४॥

१४ अन्नार्थ सेवि नित हा यवनाधिपाला ।
ते मात्र क्रूर छळिती अति या द्विजाला ॥
दुर्भाव घालवुनि सन्मति दे नृपाला ।
‘ त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ’ ॥१५॥

४४ शीतार्थ वन्हि नगरांतुनि आणु गेला ।
दोहीकडे बघुनि नाग भयार्त झाला ॥
त्या ‘ सायनासहि ’ परीक्षुनि उद्धरीला ।
‘ त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ’ ॥१६॥

१५ या भारतांतिल समस्तहि तीर्थयात्रा ।
तैशा कराच विधि-युक्त तटाकयात्रा ॥
शिष्यांस सांगुनि असे गुरु जाति शैला ।
‘ त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ’ ॥१७॥

१६ कोपूनि सद्‌गुरुवरी कुणि मूर्ख आला ।
सेवा कशी करिति ते मजलागि बोला ॥

अध्याय सांगे कृपाळु गुरु " धौम्य-कथा" तयाला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥१८॥

१७ कापूनि जीभ 'भुवनेश्वरिचें' ठिकाणीं ।
निर्वाण मांडुनि बसे मतिमंद कोणी ॥
ठेवून हस्त शिरिं त्यास सुबुद्ध केला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥१९॥

१८ दारांत मंडप खुले नव घेवड्याचा ।
निर्वाह त्यावरति चालतसे द्विजाचा ॥
त्यातें निधान दिधलें उपटूनि वेला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥२०॥

१९ माध्यान्हकाळि यति संगमि गुप्त जाती ।
चौसष्ट योगिनि तयांप्रति पूजिताती ॥
भिक्षा करूनि निघती 'अमरेश्वराला' ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥२१॥

१९ गंगाप्रवाह तळिच्या 'अमरावतीचा'
'गंगानुजा' मिळत लाभहि पाहण्याचा ॥
होताच सद्‌गुरु-कृपा धनवान झाला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥२२॥

अध्याय दांपत्य सत्वगुणि एक ‘ शिरोळवासी ’
२०व२१ झालीं मुलें कितिक शैशवि स्वर्गवासी ॥
होता कृपा मृत-मुलास जिवंत केला ।
‘ त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ’ ॥२३॥

२२ त्या ‘ गाणगापुरि ’ दरिद्रि सुविप्र राही ।
संपादि वांझ महिषीवरि द्रव्य कांहीं ॥
तीतें कृपें दुभवुनी पय देति त्याला ।
‘ त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ’ ॥२४॥

२३ अश्वत्थवृक्षि कुणि ‘ राक्षस ’ एक राही ।
‘ दत्तात्रया ’ बघुनि तो पदिं लीन होई ॥
देती कृपाळुयति संगमि मुक्ति त्याला ।
‘ त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ’ ॥२५॥

२४ राहे ‘ त्रिविक्रम ’ यती ‘ कुमशीपुरींत ’ ।
तो दत्त सद्गुरुसि दांभिक मानि नित्य ॥
‘श्रीदत्त’ आणि ‘शिव’ एकचि दावि त्याला ।
‘ त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ’ ॥२६॥

२५ते२७ वेदज्ञ थोर न अम्हांविण भारतांत ।
ऐसें ‘ द्विजद्वय ’ मदें जयपत्र घेत ॥

अध्याय दे गर्व नाशुनिहि राक्षस-योनि त्यांला ।
' त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ' ॥२७॥

२६ देवेंच वेद-गिरि तीन विशाल केलें ।
विप्रास तीन मुठि त्यांतिल अर्पियेलें ॥
ही सर्व पूर्व घटना कथिली जगाला ।
' त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ' ॥२८॥

२७ रेषांस पार करितां ' अतिशूद्रकानें ' ।
मागील जन्म कथिलें विनयें तयानें ॥
तो वेद-घोषहि करी, अशि होय लीला ।
' त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ' ॥२९॥

२८ स्नानेंहि शूद्र-विभुती परिपूर्ण गेली ।
तो ज्ञान दिव्य विसरे स्मृति पूर्व आली ॥
त्यांतें सुबुद्धि तुज तारिल बोध केला ।
' त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ' ॥३०॥

२९ ' द्रावीड ' विप्रखल त्या कुणि मारियेलें ।
तेथें स्मशानिं निटिलावरि श्वान गेलें ॥
भस्म-प्रभाव परि उद्धरि त्या द्विजाला ।
' त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ' ॥३१॥

अध्याय संवाद पूर्विलहि 'राक्षस-वामदेव' ।
२९ ऐकून पूर्ण पटतो विभुति-प्रभाव ।।
मागील जन्म कथिलें तयिं पंचवीस ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींस' ।।३२।।

३०ते३४ राहे कुटुंब अति सद्‌गुणि 'माहुराला' ।
नाथास व्याधि जडुनी मृत त्यांत झाला ।।
सन्मार्ग सर्व कथिलें तयिं त्या स्त्रियेला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ।।३३।।

३१ स्त्रीधर्म काय सतिनें नित आचरावें ।
वैधव्य-कालिंहि तिनें व्रत काय घ्यावें ।।
सांगे 'अगस्ति-सति-वैभव' त्या स्त्रियेला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ।।३४।।

३२ होता पती निधन साध्वि सती निघाली ।
मार्गांत सद्‌गुरुपदीं क्षणि लीन झाली ।।
सौभाग्य दे परत तोषुनि त्या सतीला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ।।३५।।

३३व३४ पूर्वी 'पराशर' मुनी नृप 'भद्रसेना' ।
'रुद्राक्ष-रुद्र-महिमा' कथिती तयांना ।।

अध्याय गंडांतरामधुनि वाचवि तत्सुताला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥३६॥

३५ हो व्याधिमुक्त पति तोषहि होय फार ।
दांपत्य तें करितसे व्रत 'सोमवार' ॥
प्रेमें शतायु सुत-पंचक देति त्याला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥३७॥

३५ 'संजीवनी' शिकवि मंत्र सुकन्यकेला ।
सामर्थ्यहीन म्हणुनी झणि तो जहाला ॥
नाहीं सुपंथ पति-भक्तिविणें स्त्रियेला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥३८॥

३५ पाताळिचा स्वपति आणवि वैभवानें ।
राज्योपभोग मग सर्वहि घे सुखानें ॥
'सीमंतिनी'-व्रत-महत्व कळे जगाला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥३९॥

३६ मोडी पतीनियम वेडि परान्न घेई ।
श्वानादि पात्रि बघतां मनि वीट येई ॥
सत्त्वस्थ तीस करि नाशुनि दुर्मतीला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥४०॥

अध्याय आचारधर्म कसले कुणि आचरावें ।
३६व३७ वर्णाश्रमीं विहितकर्म कसें करावें ॥
हा सर्व 'आन्हिक-विचार' कथी जगाला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥४१॥

३८ भिक्षा करूं म्हणत 'भास्कर' ये मठाला'।
राहीं परान्नि रत, निंदिति लोक त्याला ॥
त्याच्याकरें करविती बहु अन्नदाना ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींना' ॥४२॥

३९ 'अश्वत्थ पूजुनि' अखेर निराश झाली ।
तीतें पुन्हां गुरुंनि त्या व्रतिं लावियेली ॥
त्या स्त्रीस साठि सरल्यावरि पुत्र झाला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥४३॥

४० येई कुणी 'नरहरी' द्विज एक कुष्टी ।
घालीतसे जल उदुंबर शुष्क काष्ठीं ॥
काष्टासपर्ण फुटतांच निरोगि केला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥४४॥

४१व४२ 'त्वष्टाकुमार' करि ज्यापरि काशियात्रा ।
ती सर्व मागिल कथा कथिली सुमित्रा ॥

३९५३४ वि:
९५३४ नों: दि: २


अध्याय हा क्षेत्र 'काशि-महिमा' कळवी जगाला ।
'त्या वंदु वंद्य नरसिह-सरस्वतींला' ॥४५॥

४३ 'कौंडिण्य' नेणुनि महत्त्व 'अनंत' जाळी ।
तो वैभवावरुनि तत्क्षणिं येइ खालीं ॥
ऐशी 'अनंत-महती' पटवी तयाला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ॥४६॥

४४ शैलास नेति झणिं सद्गुरु 'तंतुकाला' ।
तेथेंहि शंकर जणों गुरुरूप झाला ॥
ऐशी गुरूमहति दाविति सेवकांला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥४७॥

४४ राजा 'विमर्षण' असे अति पापकर्मी ।
तो देव-पूजन बघे परि श्वानजन्मीं ॥
त्यातेंहि सद्गति मिळे कथिलें जगाला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥४८॥

४५ तो कुष्टि 'नंदि' तुळजापुरिं नम्र होई ।
ये 'चंदलेश्वरिं' परी गुण त्या न येई ॥
तो 'गाणगापुरिं' अखेर निरोगि झाला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥४९॥

अध्याय तो शिष्य सद्‍गुरुसि बोलत ' नंदिनामा ' ।
४५ कैसें कवित्व करुं अक्षर यें न आम्हां ॥
जिव्हेस लावुनि विभूति सुजाण केला ।
' त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ' ॥५०॥

४६ सांबाविना प्रभु नसे ' नरकेसरीला ' ।
लिंगांत श्रीगुरु दिसे परि आजि त्याला ॥
तैं द्वैत नाशुनि तया कवि शिष्य केला ।
' त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ' ॥५१॥

४७ ' यावें दिवाळिस गुरो ! अमुच्या गृहाला ।
सातां जनीं मिळुनि आग्रह फार केला ॥
रूपेंहि अष्ट धरुनी सुखवी तयांला ।
' त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ' ॥५२॥

४८ श्रद्धाळु ' शेतकरि ' कापितसे पिकाला ।
पाहूनि आप्तगण त्यावरि रुष्ट झाला ॥
भक्तीबलें अमित धान्यहि देति त्याला ।
' त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला ' ॥५३॥

४९ ' रत्नाइ ' कुष्टि बनली भगिनी गुरूंची ।
हत्त्या घडे तिजसि पांचहि मांजरांची ॥

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ३९५३८ वि:
क्रमांक २५३८ नों: दि:



अध्याय स्नानत्रयें करिति व्याधि-विमुक्त तीला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥५४॥

५० राज्यावरी रजक म्लेंछ-कुळांत आला ।
वृद्धापकालि परि फोड तयास झाला ॥
तो नाशुनी करिति मुक्त गुरु तयाला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥५५॥

५० सापत्नभाव सवतीप्रति दे विषाला ।
नासूनि देह मृत तत्सुत त्यांत झाला ॥
भावामुळें 'ऋषभ' त्या उठवीत बाळा ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥५६॥

५१ 'नंदी' तसें 'नृहरि' 'सायनदेव' 'सिद्ध' ।
चौघांस पाठवुनि चार फुलें प्रसाद ॥
जो मल्लिकार्जुन–स्वरूपिं विलीन झाला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥५७॥

५२ भक्तार्थ ठेविति गुरू निज पादुकांला ।
भावें करोत जन पूजन–आरतीला ॥
गेले जरी असति गुप्तचि ते मठाला ।
'त्या वंदु वंद्य नरसिंह-सरस्वतींला' ॥५८॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०५५१
दा. क्र.
ग्रंथ शाखा



अध्याय ५३ संवाद ' नामकरणी ' सह ' सिद्ध ' यांचा ।
सद्ग्रंथ हो ' गुरुचरित्र ' महान साचा ॥
जैं धन्य धन्य धन्य कवि ' सायनवंश ' केला ।
त्या वंदु लेखक सुभक्त ' सरस्वतींला ' ॥५९॥

( वृत्त–अनुष्ठुभ )

सद्गुरूच्या चरित्राची । गुंफुनी श्लोक-मालिका ॥
अर्पी ' विष्णुसुत ' प्रेमें । सादरें श्रीपदांबुजा ॥ ६० ॥

---

## आमचीं प्रकाशनें

१) विष्णुसुतांची कविता ... ... ... किं. १ रु.
२) हुरडा ... ... ... ... किं. ३७ न. पै.

आगामी:- १ ) मुलांचा राष्ट्रीय मित्र ( बोधपर कविता )
२ ) समर्थ संकीर्तन ( कीर्तनमाला )
३ ) मुलांचा एकनाथ ( बालबोध चरित्र )
४ ) आमचें सण ( हिंदु सणांची ओळख )

---

प्रकाशक : **रामचंद्र विष्णु कुलकर्णी** उर्फ कवि विष्णूसुत
उंब्रजकर २४८ सोमवार, कऱ्हाड ( ऊ. सातारा )
मुद्रक : **रामचंद्र गणेश गिजरे**
प्रोप्रायटर श्रीगजानन प्रेस, कऱ्हाड.